सम्यक
संवाद व संसाधन केंद्र, पुणे

# मर्जी

## माझ्या शरीरावर माझा हक्क

जानेवारी - मार्च, २०१६
अंक तिसरा

### संपादकीय

मित्र-मैत्रिणींनो, सप्रेम नमस्कार. 'मर्जी' त्रैमासिकाचा तिसरा अंक आपल्या हातात देताना आम्हाला अतिशय आनंद होत आहे.

सन १९७१ मध्ये भारतामध्ये वैद्यकीय गर्भपाताचा कायदा अस्तित्वात आला. त्यावेळी गर्भपाताचा उदारमतवादी कायदा करणारा एक देश, अशी भारताची ओळख होती. दक्षिण आशियात आजही काही देशांमध्ये गर्भपाताला सढळ परवानगी देणारे कायदे अस्तित्वात नाहीत. उदा. श्रीलंकेमध्ये फक्त आईचा जीव वाचविण्यासाठी गर्भपाताला मान्यता आहे याव्यतिरिक्त गर्भपात केल्यास करणाऱ्या आणि करवून घेणाऱ्या व्यक्तीला ३ वर्षांपर्यंत कारावास किंवा दंड किंवा दोन्ही अशी शिक्षा होऊ शकते. पाकिस्तानमध्ये गर्भपात १२० दिवसांपर्यंत कायदेशीर आहे, परंतु धर्माचा प्रभाव असणारे अनेक वैद्यकीय व्यावसायिक गर्भपाताची सेवा देत नाहीत. बांगलादेश मध्ये गर्भपात हा शब्द वापरण्यासच मनाई आहे पण तिथे 'मेन्स्ट्रअल रेग्युलेशन' या नावाने १२ आठवड्यांपर्यंत गर्भपाताची प्रक्रिया करता येते. नेपाळमध्ये २००२ पर्यत गर्भपात बेकायदेशीर होता पण २००२ मध्ये नेपाळने गर्भपाताच्या कायद्यांमध्ये बदल केले आणि १२ आठवड्यांपर्यंत मागणीवर गर्भपाताच्या सेवा देण्यास सुरुवात केली. यासाठी स्त्रीला कोणतेही कारण देण्याची किंवा कोणाच्याही परवानगीची गरज लागत नाही आणि प्रशिक्षित नर्स देखील ९ आठवड्यांपर्यंत गर्भपाताची प्रक्रिया करतात. नेपाळने केलेल्या कायद्यामधील या बदलाने तेथील असुरक्षित गर्भपातांमुळे होणाऱ्या मातामृत्यूचे प्रमाण जवळ-जवळ ५०% ने खाली आले. या सर्व देशांच्या तुलनेत भारतामध्ये खूप आधी गर्भपात कायदेशीर करण्यात आला, परंतु भारतात आजही एकूण माता मृत्यूंपैकी ८ ते १२% मातामृत्यू हे असुरक्षित गर्भपातांमुळे होतात. हे प्रमाण नेपाळ आणि बांगलादेश यांसारख्या देशांच्या तुलनेत कितीतरी अधिक आहे.

भारताच्या संदर्भात गर्भपाताचा मुद्दा समजावून घेत असताना, गर्भपाताकडे 'पाप' म्हणून बघण्याचा दृष्टीकोन, पितृसत्ताक समाजात स्त्रियांच्या शरीरावर असणारी बंधने, आरोग्य सेवांचे वाढते खाजगीकरण, सरकारी आरोग्य व्यवस्थेची वाताहत आणि आपली पाळेमुळे आणखी घट्ट करू पाहणारी धर्म व्यवस्था या सध्याच्या सामाजिक परीस्थितीकडे दुर्लक्ष्य करून चालणार नाही. स्वघोषित 'साधू-साध्वीं' पासून ते खासदारांपर्यंत भारतीय स्त्रियांनी जास्तीत जास्त मुलांना जन्म दिला पाहिजे असे वक्तव्य अनेकजण उघडपणे करताना आज आपल्याला दिसतात. येत्या काळात स्त्रियांच्या प्रजनन आणि लैंगिक हक्कांवर आणखी जास्त बंधने येणार हेच यातून दिसते. त्यामुळेच जास्तीत जास्त लोकांनी या विरोधात आवाज उठवणे आणि स्त्रियांच्या लैंगिक व प्रजनन हक्कांसाठी लढा उभारणे गरजेचे झाले आहे.

समाजाला मागे नेणाऱ्या सर्व गोष्टींना विरोध करण्याचा प्रयत्न 'मर्जी' त्रैमासिकामार्फत आम्ही करत आहोत. प्रस्तुत अंकामध्ये सुरक्षित गर्भपातासंदर्भातील भारतातील कायदा व परिस्थिती याची मांडणी विवेचनामध्ये करण्यात आली आहे. याच बरोबर अमेरिका, आर्यलंड आणि पोलंड या देशांमध्ये सुरक्षित गर्भपाताच्या मागणीसाठी उभारण्यात आलेल्या स्त्रीवादी लढ्यांचा आढावा' इतिहासाच्या झरोक्यातून' या सदरातून घेण्यात आला आहे. या अंकाबद्दल आपल्या प्रतिक्रीया आम्हाला नक्की कळवा. धन्यवाद!

■■■

## डोकावून पहा


- संपादकीय ....१
- **विवेचन**
  स्त्रीचा सुरक्षित गर्भपाताचा हक्क ...२
- **आम्ही कुठं जायचं?** ...३
- **इतिहासाच्या झरोक्यातून**
  सुरक्षित गर्भपाताच्या हक्कासाठी
  स्त्रियांनी उभारलेले लढे ...४
- **प्रतिक्रिया** ...५
- **वार्तांकन** ...६
- **'मर्जी' : माझ्या शरीरावर माझा हक्क!** ...८


## खरंच की !



साभार : गार्गी गांधी

# स्त्रीचा सुरक्षित गर्भपाताचा हक्क

**गर्भपात म्हणजे काय**

गर्भधारणेपासून २० आठवड्यांच्या काळातील गर्भ कोणत्याही पद्धतीने काढून टाकणे किंवा पडून जाणे म्हणजे गर्भपात.

**गर्भपात सुरक्षित की असुरक्षित ?**

गर्भपात हा किती सुरक्षित किंवा किती असुरक्षित असतो हे पुढील काही घटकांवर प्रामुख्याने अवलंबून असते : गर्भ किती दिवसांचा/आठवड्यांचा आहे, गर्भपात करण्यासाठी कोणती पद्धत अवलंबली जाते आहे, तो करणाऱ्या वैद्यकीय व्यावसायिकाकडे कौशल्य, अनुभव आणि सावधगिरी आहे का आणि गर्भपात करताना काही तातडीच्या उपचारांची गरज पडली तर गर्भपात केंद्रामध्ये वैद्यकीय सेवा उपलब्ध आहेत का ?

स्त्रिया सर्वसाधारणपणे कोण-कोणत्या परिस्थितीमध्ये गर्भपात करून घेण्यास पुढे येतात ? गर्भनिरोधक फसले, जोडीदार-नवरा गर्भनिरोधक वापरण्यास, वापरू देण्यास तयार नाही, बलात्कारातून, विवाहपूर्व अथवा विवाहबाह्य संबंधांतून गर्भ राहिला, मूल हवे-नको याचा पुरेसा विचार झालेला नसताना गर्भधारणा झाली, आर्थिक परिस्थिती बेताची आहे त्यामुळे मूल सांभाळणे शक्य नाही, नवरा किंवा जोडीदार पितृत्वाची जबाबदारी घेण्यास तयार नाही, मूल सांभाळण्याची तिची मानसिक, शारीरिक, आर्थिक कुवत नाही, नणंद, जाऊ किंवा माहेरी भावजय, लहान बहिण यांचे बाळंतपण आहे, एका वेळी दोघींचे बाळंतपण करणे आई किंवा सासू यांना शक्य होणार नाही, जन्माला येणारे मूल अपंग किंवा काही इतर व्याधी घेऊन जन्माला येणारे असेल वगैरे वेगवेगळ्या परिस्थितींमध्ये स्त्रिया गर्भपाताची मागणी करतात.

गर्भपातादरम्यान गरोदर स्त्रीला सर्वसाधारणपणे पुढील धोके होण्याची शक्यता असते :

गर्भपात करताना गर्भाशयाचे अस्तर गर्भाशयाच्या बाहेर पूर्णतः फेकले न जाणे म्हणजेच अर्धवट गर्भपात होणे, जंतूलागण होणे, गर्भाशयाच्या पिशवीला, बीजवाहक नलिका, मूत्राशय यांना गर्भपातादरम्यान दुखापत होणे, तीव्र रक्तस्राव होणे अशा प्रकारचे धोके असू शकतात. स्त्रीला ओटीपोटात दुखणे, कंबरदुखी, सतत अंगावरून लाल जाणे म्हणजेच मायांगातून रक्तस्राव होणे, गर्भाशयाला सूज येणे अशा तक्रारी जाणवतात. असुरक्षित गर्भपातादरम्यान मुळात रक्तपांढरी असलेली, वारंवार बाळंतपणं, गर्भपात झालेली स्त्री तातडीने उपचार मिळाले नाहीत तर दगावण्याची शक्यता खूपच जास्त असते.



'कन्सोर्शियम ऑन नॅशनल कन्सेन्सेस फॉर मेडीकल ॲबोर्शन इन इंडिया' (The Consortium on National Consensus for Medical Abortion in India) यांच्या आकडेवारीनुसार दरवर्षी सुमारे ११ दशलक्ष गर्भपात होतात, त्यातील २०,००० स्त्रिया गर्भपातामध्ये दगावतात.

असे असले तरीही गर्भपाताचा हक्क आपल्याला हवा आहे. म्हणजे काय तर, गोपनीय व सुरक्षित गर्भपाताची सेवा प्रत्येक स्त्रीला परवडणा-या किंमतीत मिळवून देणे ही शासनाची जबाबदारी आहे. जर अशी सेवा मिळाली नाही तर कायद्याच्या मदतीने आपण न्यायालयाकडे दाद मागू शकतो. म्हणजे गर्भपाताची सेवा देण्याची जबाबदारी शासनाने पार पाडली नाही तर न्यायालय शासनाला जाब विचारू शकते. म्हणून सुरक्षित गर्भपात हा आपला हक्क आहे असे म्हणू शकतो. अर्थात भारतामध्ये काही ठरावीक परिस्थितीमध्येच हा हक्क आपण बजावू शकतो.

**कायदा काय सांगतो ?**

१९६६ साली केंद्र शासनाने नेमलेल्या एका समितीच्या शिफारसींनुसार १९७१ साली मेडिकल टर्मिनेशन ऑफ प्रेग्नन्सी ॲक्ट म्हणजेच वैद्यकीय गर्भपाताचा कायदा भारतामध्ये अस्तित्वात आला. झालेली गर्भधारणा ठरावीक परिस्थितीत काढून टाकण्यासाठी सेवा उपलब्ध करून देणे एवढ्याच मर्यादित हेतूने हा कायदा तयार करण्यात आलेला आहे. गर्भपातासाठी गरोदर स्त्रीची संमती घेणे या कायद्यामध्ये अनिवार्य आहे. गरोदर स्त्री ही सक्षम असेल व सज्ञान असेल तर तिची स्वतःची लेखी संमती व ती अज्ञान असेल, मानसिक दृष्ट्या आजारी असेल तर तिच्या पालकांची लेखी संमती घेणे कायद्यानुसार बंधनकारक आहे. लेखी संमतीचा अर्थ संबंधित स्त्रीला किंवा तिच्या पालकांना गर्भपातासाठी वापरली जाणारी पद्धत कोणती हे समजावून सांगण्यात आलेले आहे. गर्भपातामुळे तिच्या शरीरावर होणाऱ्या संभाव्य परिणामांची तिला जाणीव करून देण्यात आलेली आहे. गर्भपात करण्यासाठी तिच्यावर कोणताही दबाव किंवा दडपण आणण्यात आलेले नाही आणि तिने स्वतःच्या इच्छेने गर्भपात करण्याची परवानगी डॉक्टरांना दिलेली आहे.

गर्भधारणेमुळे मातेच्या जीवाला व आरोग्याला धोका असेल, किंवा जन्माला येणाऱ्या बाळाला शारीरिक, मानसिक व्याधी असण्याची शक्यता असेल तरच हा कायदा गर्भपाताला परवानगी

देतो. म्हणजेच बलात्कारातून किंवा गर्भनिरोधकांच्या वापरानंतरही राहिलेला गर्भ, मातेची शारीरिक मानसिक तयारी नसताना राहिलेला गर्भ हा तिच्या मानसिक शारीरिक आरोग्यावर परिणाम करू शकतो, असे यामध्ये गृहित धरण्यात आलेले आहे. म्हणून त्या प्रकारच्या गर्भपातांनाही कायदा परवानगी देतो.

प्रत्यक्षात मात्र गर्भपात केंद्रांमध्ये यासंदर्भात गोपनीयता पाळली जात नाही. नसबंदीची शस्त्रक्रिया करण्याची अट घालूनच गर्भपात केला जातो. अपुऱ्या, अनारोग्यकारक आणि वेळेवर न मिळणाऱ्या सरकारी सेवा घ्यायच्या की कर्ज काढून, पैसे भरून खासगी सेवा घ्यायच्या हा निर्णय गरोदर बाईला घ्यावा लागतो. अनेक केंद्रांमध्ये गर्भपातासाठी आलेल्या स्त्रीकडे संशयाने, ती पाप करत आहे अशा नजरेने पाहिले जाते. गर्भपातापूर्वी पुरेसे समुपदेशन केले जात नाही आणि गर्भपातानंतरच्या सेवाही काळजीपूर्वक दिल्या जात नाहीत.

स्त्रीवादी चळवळीने 'माझ्या शरीरावर माझा हक्क' ही घोषणा केली ती एकंदर प्रजनन आरोग्य सुधारावे आणि स्वनिर्णयाचा हक्क मिळावा यासाठी. स्त्रियांची लैंगिकता, लैंगिक अवयव यासंदर्भात समाजामध्ये गूढ आणि अपमानजनक भावना निर्माण करणारे वातावरण तयार झाले आहे. या पार्श्वभूमीवर गर्भपाताशी अपराधीभाव जोडून दिला जातो. कुमारी, विधवा एकट्या स्त्रियांना गर्भपात, गर्भनिरोधके यासंदर्भात सेवा देताना भेदभाव केला जातो. स्त्रीची लैंगिकता विवाहबंधनापुरती मर्यादित नाही. विवाहबंधनाव्यतिरिक्तही स्वतःची लैंगिकता व्यक्त करण्याचे किंवा न करण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे. विवाहाबाहेर असलेल्या प्रौढ कुमारिका, विधवा, परित्यक्ता, घटस्फोटीत, समलिंगी, वेश्या, अपंग, गरीब, एड्सग्रस्त अशा स्त्रियांची यादी फार मोठीच होते. या स्त्रियांचा त्यांच्या प्रजनन आणि लैंगिक आरोग्यावर हक्क आहे हे आपण मान्य करत असू तर सोपी, सुरक्षित, स्वस्त व सहज उपलब्ध गर्भनिरोधके व गर्भपाताच्या सोयी यांच्या मागणीला आपल्याला पाठिंबा द्यावाच लागेल. एवढेच नाही तर गर्भाचे मातेशी असलेले नाते समजून घेऊन स्त्रीचा गर्भ ठेवण्या न ठेवण्याचा हक्क आपण मान्य केला पाहीजे. गर्भपाताला गर्भहत्या म्हणून आपण पुन्हा स्त्रियांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करून चालणार नाही. त्यांच्या निर्णयप्रक्रियेमध्ये नकळत आणि जाणूनबुजून आणले गेलेले अडथळे दूर करणे हे सामाजिक न्याय मान्य असलेल्या प्रत्येकाचेच कर्तव्य ठरते.

## आम्ही कुठं जायचं?

स्वाती (नाव बदलले आहे) सोलापूर जिल्ह्यातील एका छोट्या गावात तीन मुले, नवरा आणि सासू यांच्यासोबत रहाते. स्वातीचा नवरा पैसे कमावत नाही. तिची सासू मजुरी करते आणि स्वाती घरात पिठाची गिरण चालवते. घराची सगळी जबाबदारी तिच्यावर आहे. २०१३ मध्ये स्वातीला तिसरा मुलगा झाला. त्यानंतर तिला नऊ महिने मासिक पाळी आली नाही. त्यासाठी ती जवळच्या दवाखान्यात गेली. तिथे डॉक्टर म्हणाले की, मूल लहान आहे म्हणून मासिक पाळी येत नसेल. त्यानंतर स्वाती ज्या दवाखान्यात बाळंतपण झाले होते तेथे पुन्हा एकदा तपासण्यासाठी गेली. तिथल्या डॉक्टरने तिला काही दिवस खाण्यासाठी गोळ्या दिल्या आणि सांगितले की यामुळे पाळी सुरू होईल. स्वातीने त्या गोळ्या खाल्ल्या तरीही तिची मासिकपाळी सुरू झालीच नाही. त्यामुळे काही दिवसांनी ती पुन्हा दवाखान्यात गेली.

दुसऱ्यांदा दवाखान्यात गेल्यानंतर डॉक्टरने तिला सोनोग्राफी करून घ्यायला सांगितले. सोनोग्राफी रिपोर्ट मध्ये समजले की स्वाती १४ आठवड्यांची गरोदर आहे. सोनोग्राफीचा रिपोर्ट पाहिल्यानंतर स्वातीने गर्भपात करण्यासंदर्भात डॉक्टरांना विचारले, यावर ते म्हणाले की, 'आता गर्भपात करणे अवघड आहे. मी काय कोणीच गर्भपात करणार नाही. १२ आठवडे पूर्ण झालेत त्यामुळं आता गर्भपात करता येत नसतो'. स्वातीने अनेकदा विनंती करूनही डॉक्टरांनी तिला 'नाही' म्हणूनच सांगितले. यावर स्वाती बार्शी आणि सोलापूर मधील अनेक खाजगी आणि सरकारी दवाखान्यांत फिरली, परंतु तिला सर्वांकडून हेच ऐकावे लागत होते.

साधारणपणे एक महिन्यानंतर स्वातीने ही गोष्ट तिच्या आईला सांगितली आणि तिच्या आईला मुंबईत राहणाऱ्या एका मैत्रिणीने सुचवले की तिकडे तिच्या माहितीतले एक डॉक्टर आहेत ते गर्भपात करतील. त्यांनी स्वातीला मुंबईला येण्याचा सल्ला दिला. दुसऱ्याच दिवशी स्वाती आणि तिची आई मुंबईला गेल्या आणि त्यानंतर 'त्या' डॉक्टरकडे. डॉक्टरने सांगितले मी आधी सोनोग्राफी करेन आणि जर ५ महिन्याच्या आत असेल तरच गर्भपात करेन. सोनोग्राफी मध्ये साडेचार महिने झालेत असे दिसले आणि स्वातीला दुसरे दिवशी ॲडमिट व्हायला सांगितले आणि तिथे तिचा गर्भपात केला गेला.

या सगळ्या प्रक्रियेत स्वातीला घरच्या कोणाचीही मदत मिळाली नाही आणि १८ ते २० हजार रुपयांचे कर्ज झाले.

■■■

# सुरक्षित गर्भपाताच्या हक्कासाठी स्त्रियांनी उभारलेले लढे





स्नेहा गोळे

भारतात गर्भपाताची चर्चा खऱ्या अर्थाने सुरू झाली ती घटत्या बाल लिंगगुणोत्तराच्या आणि लिंगनिदान करून होणाऱ्या स्त्री गर्भाच्या निवडक गर्भपाताच्या संदर्भातच. याचे एक प्रमुख कारण असे होते की भारतात गर्भपाताचा जो कायदा आला तोच मुळी स्त्री चळवळीच्या रेट्यामुळे आलेला नसून, भारतीय राष्ट्र-राज्याच्या लोकसंख्या नियंत्रणाच्या धोरणाचा भाग म्हणून आला. त्यामुळे Medical Termination of Pregnancy (MTP) कायद्याने गर्भपाताला स्त्रियांचा 'स्वतःच्या शरीरावरील हक्क' ह्या चौकटीत न बघता, लोकसंख्या वाढीवरील एक उपाय म्हणून बघितले. भारतीय संदर्भात गर्भपाताच्या हक्कासाठी त्यामुळे आपल्याला विशेष मोहिम घडलेली दिसत नाही. मात्र जगभरातील अनेक देशांमध्ये स्त्रियांना ह्या हक्कासाठी मोठा लढा द्यावा लागला आहे, किंबहुना अनेक ठिकाणी त्या अजूनही हा लढा देत आहेत. आपण ह्या संघर्षांचा थोडक्यात आढावा घेणार आहोत.

### अमेरिकेतील संघर्ष

अमेरिकेत गर्भपाताच्या संदर्भातील संघर्ष समजून घेण्यासाठी आपल्याला 'रो विरुद्ध वेड' या न्यायालयीन निकालाकडे वळावे लागेल. १९७३ साली अमेरिकेतील ३० राज्यांमध्ये गर्भपात हा पूर्णपणे बेकायदेशीर होता, तर इतर २० राज्यांमध्ये काही निवडक परिस्थितींमध्ये गर्भपाताला अनुमती होती. याच साली रो विरुद्ध वेड ह्या खटल्यात अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने असा निकाल दिला की गर्भपाताचा हक्क हा स्त्रीच्या गोपनियतेच्या हक्काचा भाग असून पहिल्या तीन महिन्यात तो राज्यसंस्थेनी स्त्रियांना द्यायलाच हवा. ह्या निर्णयामुळे गर्भपातावर बंदी घालणारे कायदे हे असंविधानिक ठरवण्यात आले. मात्र न्यायालयाने पुढे जाऊन असेही म्हटले की तीन महिन्यांपलीकडे गर्भापाताच्या हक्कावर प्रत्येक राज्य वेगवेगळ्या प्रकारे निर्बंध घालू शकते. याचे कारण असे देण्यात आले की राज्य संस्थेला जीवन वाचवण्याचासुद्धा अधिकार आणि जबाबदारी आहे. त्यामुळे जेव्हा असे वाटेल की गर्भ टिकाव धरू शकतो तेव्हा त्याच्या जन्मासाठी राज्य गर्भपाताचा हक्क नियंत्रित करू शकते. अमेरिकेत गर्भपाताच्या हक्कावर सतत गदा आणण्याचे प्रयत्न होत आहेत. आजच्या घडीला अमेरिकेत गर्भपात कायदेशीर असला तरी वेगवेगळी राज्ये त्यावर अनेक निर्बंध घालू शकतात. ह्या निर्बंधांमध्ये १८ वर्षाखालील मुलींना गर्भपात हवा असल्यास त्यांच्या आई-वडिलांना कळवणे, गर्भपाताआधी सक्तीचे समुपदेशन आणि तीन महिन्यांनंतर गर्भपातावर पूर्ण बंदी अशा गोष्टींचा समावेश आहे. आजही अमेरिकेतील स्त्रीवादी गर्भपाताच्या सुरक्षित हक्कासाठी लढत आहेत. चर्च आणि उजव्या विचारसरणीचे राजकारणी यांच्या युतीतून गर्भपाताचा हक्क मर्यादित करण्यासाठी अनेक प्रयत्न चालू आहेत. गर्भपाताच्या सेवांना राज्यसंस्थेकडून निधी मिळू नये यासाठी त्यांचे प्रयत्न चालले आहेत. स्त्रीवादी गटांनी याविरुद्ध आवाज उठवला आहे, अशा प्रकारे निधी बंद करून राज्यसंस्था गरीब व परिघावर असलेल्या स्त्रियांना आणखी असुरक्षित करत आहे अशी मांडणी त्या करतात. अमेरिकेतील सर्व निवडणुकांमध्ये गर्भपाताचा मुद्दा केंद्रस्थानी आणण्यासाठीही त्यांनी प्रयत्न केले. सध्या पूर्वी पटेलमुळे अमेरिकेत या संदर्भातील चर्चेला पुन्हा तोंड फुटले आहे. पूर्वी पटेल हिला इंडिआना राज्यात भृणहत्या आणि जिवंत बाळाला सोडून देणे अशा दुहेरी गुन्ह्यांसाठी दोषी ठरवले गेले. स्त्रीवादी कार्यकर्त्यांनी या कायद्याविरुद्ध आवाज उठवला आणि असे कायदे हे नेहमी वांशिक अल्पसंख्यांक स्त्रियांना जास्त प्रमाणात लागू केले जातात हेही दाखवून दिले. पूर्वीच्या संदर्भातील न्यायालयीन लढाई अजूनही चालू आहे.

### आयर्लंडमधील गर्भपाताचा प्रश्न

भारतात आपल्याला आयर्लंड मधील गर्भपात बेकायदेशीर असण्याचा प्रश्न सविता हलाप्पनावर हिच्या मृत्यूमुळे समजला. आयर्लंडमध्ये गर्भपात हा केवळ वैद्यकीय अधिकारी करू शकतो आणि केवळ आईचा जीव वाचवण्यासाठी गर्भपाताची गरज असेल तेव्हाच. इतर कुठल्याही परिस्थितीत गर्भपात हा बेकायदेशीर आहे आणि त्यासाठी त्या स्त्रीला कारावास होऊ शकतो. सविताच्या संदर्भात असे झाले की तिचा नैसर्गिकरित्या पण अर्धवट गर्भपात झाला होता. त्यामुळे तिला दवाखान्यात नेले गेले कारण तिला बराच रक्तस्राव होत होता. मात्र तेथील डॉक्टरांनी तिच्यावर उपचार केले नाहीत. तिचा गर्भपात पूर्ण होण्यास मदत केली नाही कारण गर्भाच्या हृदयाचे ठोके चालू होते. उपचार न मिळाल्यामुळे, दवाखान्यात पोहचूनसुद्धा सविताचा मृत्यू झाला. यावर आयर्लंडमध्येच नाही तर जगभरात खूप चर्चा झाली आणि गर्भापातासंबंधी कायदे बदलण्याची मोहिम सुरू झाली. या मोहिमेचा परिणाम म्हणून आयर्लंडमधील गर्भपाताच्या कायद्यात बदल करण्यात आले असून, आत्महत्या किंवा कुठल्याही शारीरिक आजारामुळे जर स्त्रीच्या जीवाला धोका असेल तर गर्भपाताला कायदेशीर मानले जाईल. या कायद्यानंतर सुद्धा स्त्रियांना गर्भपाताच्या सेवा नाकारण्याचे प्रकार घडले आहेत, जिथे स्त्रियांनी आपल्या हक्कासाठी न्यायालयांमध्ये धाव घेतलेली दिसते. अशा प्रकारे आयर्लंडमधील स्त्रियांचा सुरक्षित गर्भापातासाठीचा लढा चालूच आहे.

### पोलंडमधील संघर्ष

खरेतर पोलंडमध्ये अनेक वर्षांपासून निवडक परिस्थितींमध्ये गर्भपात कायदेशीर होता. यात आईच्या जीवाला धोका, बलात्कारातून राहिलेला गर्भ, गर्भाची वाढ नीट नसणे अशा गोष्टींचा समावेश होता. मात्र दुसऱ्या महायुद्धाच्या काळात जेव्हा पोलंडवर जर्मन शासन होते तेव्हा गर्भपातावर कडक नियंत्रण ठेवण्यात आले, विशेषतः आर्यन स्त्रियांच्या गर्भपातावर. दुसऱ्या महायुद्धानंतर पोलंडमधील साम्यवादी सरकारने पुन्हा एकदा गर्भपात कायदेशीररित्या स्त्रियांना उपलब्ध

करून दिला. मात्र १९९० च्या दशकात साम्यवादी सरकारचा पराभव करून आलेल्या लोकशाही सरकारने पोलंडमध्ये गर्भपातावर बंदी आणली. जेव्हा स्त्रीचे आयुष्य वाचवण्यासाठी गर्भपात हा एकमेव मार्ग उरला असेल, केवळ अशाच परीस्थितीत गर्भपात केला जाऊ शकतो. जर गर्भ विकलांग असेल किंवा गर्भधारणा जर बलात्कारामुळे झाली असेल, तर गर्भपात केला जाऊ शकतो. मात्र पहिल्या परिस्थितीत डॉक्टर आणि दुसऱ्यात वकिलांनी हमी दिल्यासच स्त्रीला गर्भपाताचा हक्क मिळू शकतो. पोलंडमधील स्त्रीवादी चळवळ अनेक वर्ष हा कायदा बदलण्यासाठी संघर्ष करत आहे. मात्र पोलंडमध्ये चर्चचा वाढता प्रभाव आणि गर्भाच्या जगण्याच्या हक्कासाठी चळवळ यामुळे अजूनही पोलंडमधील गर्भपाताचे हक्क अतिशय सीमित राहिलेले आहेत.

जगभरात अनेक स्त्रिया अशा सुरक्षित गर्भपातासाठी संघर्ष करीत आहेत. स्त्रीचा तिच्या शरीरावरील हक्क विरूद्ध भृणाचा जगण्याचा हक्क अशा प्रकारे हा वाद घडताना दिसतो आहे. गर्भपाताच्या मुद्द्याकडे कसे बघायचे, तो स्त्रीच्या शरीरावरील हक्कांचा भाग म्हणून बघायचे, का आरोग्याच्या हक्कांशी जोडून घेऊन राज्यसंस्थेची आरोग्य सुविधा पुरवण्याची जबाबदारी, सामाजिक सुरक्षिततेच्या चौकटीत बघायचे अशा प्रकारे हे संघर्ष चालू आहेत.

■■■

**ज्योती भालकर, भारतीय महिला फेडरेशन, कोल्हापूर**



कोल्हापूर जिल्ह्यामध्ये लिंगनिदान विरोधी चळवळीमध्ये काम करत असताना असुरक्षित गर्भपाताच्या अनेक घटना पाहण्यात आल्या. मात्र PCPNDT कायद्याच्या अनावश्यक भीतीमुळे वैद्यकीय क्षेत्राकडून सामान्य महिलेला गर्भपाताच्या सुविधा नाकारल्या जात आहेत. या गोष्टींचा जणू विसरच पडला होता. अशावेळी 'सम्यक' संस्थेने हाती घेतलेल्या या प्रकल्पामुळे खऱ्या अर्थाने स्त्रियांना सुरक्षित गर्भपाताच्या सुविधा मिळाल्या पाहिजेत या मुद्याकडे लक्ष वेधले गेले. 'मर्जी' हॉटलाईनद्वारे अनेक महिलांना सुरक्षित गर्भपाताच्या संदर्भात माहिती उपलब्ध होत आहे. स्त्रियांचा हक्क आणि अधिकार म्हणून गर्भपाताकडे पाहिले पाहिजे. या प्रकल्पामध्ये काम करत असताना बुधनाळ, सांगाव, सांगरूळ, उचगाव, कणेरी, भामटे, गडमूडशिंगी या गावामध्ये 'मर्जी' हॉटलाईन चे पोस्टर लावले तसेच वळीवडे व गडमूडशिंगी या गावाच्या ग्रामसभांमधे सुरक्षित गर्भपातासंदर्भात ठराव केलेले आहेत.



**डॉ. कार्तिक यादव**
**सचिव OBGY उस्मानाबाद**

PCPNDT व MTP हे कायदे वेगवेगळे आहेत. दोन्ही कायद्यांची सशक्त समाजासाठी गरज आहे. PCPNDT च्या कडक अंमलबजावणीमुळे काही डॉक्टरांनी (स्त्री-रोग तज्ज्ञ) SECOND TRIMESTER गर्भपात करणे बंद केलेले आहे. त्यामुळे काही गरजू महिला असुरक्षित पद्धतीने गर्भपात करून घेत असण्याची शक्यता आहे. अशा अवैद्यकीय गर्भपाताने महिलेच्या जीवाला प्रचंड धोका उत्पन्न होतो. हे धोके टाळून मातामृत्यूदर कमी करण्यासाठी वैद्यकीय गर्भपात केंद्रातून योग्य ती सेवा गरजू स्त्रियांना मिळणे आवश्यक आहे. PCPNDT कायद्याची व MTP कायद्याची जागृती 'सम्यक' संस्था पुणे मार्फत स्त्री रोग तज्ज्ञ व समाजामध्ये केली जात आहे हे अत्यंत महत्त्वाचे आहे. 'सम्यक' संस्थेला व त्यांच्या या कौतुकास्पद उपक्रमाला उस्मानाबाद स्त्री-रोग तज्ज्ञ संघटनेतर्फे शुभेच्छा तसेच गरजू महिलांना कायद्याच्या अंतर्गत राहून योग्य ती वैद्यकीय गर्भपात सेवा पुरवण्याचे आव्हान ही संघटना स्त्री-रोग तज्ज्ञांना करते.

**डॉ. रेखा देशपांडे, स्त्री-रोग तज्ज्ञ, नांदेड**



'सम्यक' तर्फे २८/०३/२०१६ रोजी नांदेड येथे सुरक्षित गर्भपात या विषयाबद्दल कार्यशाळा घेण्यात आली, त्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन व मन:पूर्वक आभार. एखादी संस्था या संदर्भात काम करत आहे ही बाब सर्व महिला व डॉक्टरांसाठी खूप महत्त्वाची आहे. प्रीत यांनी संस्थेच्या कार्याची माहिती दिली व ती कौतुकास्पद आहे. डॉ. गोरख यांनी MTP व PCPNDT कायद्यासंदर्भात माहिती दिली. त्यामुळे प्रसूतीतज्ज्ञांचा संभ्रम कमी होण्यात निश्चितच मदत होईल. PCPNDT कायद्याच्या अंमलबजावणीमुळे गर्भपाताच्या सेवा देताना स्त्रीरोग तज्ज्ञांच्या मनात असुरक्षिततेची भावना आहे. ती कमी होण्याच्या दृष्टीनेही कार्यशाळा महत्त्वाची ठरेल.

'सम्यक'च्या कार्यामुळे डॉक्टर, प्रशासन, मिडिया व लाभार्थी यांच्यात समन्वय साधला जाऊन या सेवा देताना येणाऱ्या अडचणी कमी होतील. कुटुंबनियोजनाच्या साधनांचा प्रचार व प्रसार या संबधीही त्यांचे काम प्रशंसनीय आहे.

■■■

# जन वकालत : एक पाऊल पुढे...

'लिंगनिदानाला विरोध आणि स्त्रियांना सुरक्षित गर्भपाताची हमी' ही प्रक्रिया सुरू असलेल्या दहा जिल्ह्यांमध्ये आम्ही जास्तीत-जास्त लोकांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न या तिमाहित (जानेवारी ते मार्च २०१६) केला. या प्रक्रियेत सहभागी असणाऱ्या पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील संस्था-संघटनांच्या प्रतिनिधींनी यामध्ये मोठा सहभाग नोंदवला. याचबरोबर पुढील काळात राज्यस्तरावर या प्रक्रियेसंदर्भात चर्चा सुरू होण्यासाठी काय करता येईल याबद्दलही अनेक तज्ज्ञांनी त्यांची मते नोंदवली. या तिमाहित आयोजित करण्यात आलेल्या कृतीकार्यक्रमांचा आढावा या सदरात आपल्यापुढे मांडत आहोत.

**पुणे, उस्मानाबाद, लातूर आणि नांदेड येथे खाजगी वैद्यकीय व्यावसायिक, सरकारी यंत्रणेचे प्रतिनिधी आणि जिल्हा महिला व बाल विकास विभागाचे प्रतिनिधी यांच्यासोबत चर्चासत्रांचे आयोजन:**

जानेवारी ते मार्च २०१६ या कालावधीत विविध गटांच्या प्रतिनिधींबरोबर आयोजित करण्यात आलेल्या चर्चासत्रांमध्ये सुरक्षित गर्भपात आणि लिंगनिदान या मुद्द्यांसंदर्भातील विविध पैलूंची चर्चा करण्यात आली. सुरक्षित गर्भपात आणि लिंगनिदान हे दोनही कायदे वेगवेगळे आहेत, MTP आणि PCPNDT कायद्याची अंमलबजावणी करत असताना त्यांच्यामध्ये केली जाणारी गल्लत आणि त्याचा सुरक्षित गर्भपाताच्या सेवांवर होणारा परिणाम, स्त्रियांना सुरक्षित आणि कायदेशीर गर्भपाताच्या सेवा नाकारल्या जाऊ नयेत यासाठी काय करता येईल असे अनेक मुद्दे यादरम्यान चर्चिले गेले. याचबरोबर या सगळ्यांचे लिंगभावावर आधारित पितृसत्ताक व्यवस्थेच्या चौकटीतून विश्लेषण केले गेले पाहिजे हा महत्त्वाचा मुद्दा या चर्चासत्रांमध्ये मांडला गेला. या सर्व चर्चासत्रांमध्ये एकूण १२८ प्रतिनिधींनी सहभाग नोंदवला.




**पुणे येथे आयोजित करण्यात आलेल्या चर्चासत्रामध्ये पुणे जिल्ह्याच्या PCPNDT कायदेविषयक सल्लागार मेघा सोनतळे (डावीकडे) आपले मत मांडताना, शेजारी डॉ. सुचित्रा दळवी**

या सर्व चर्चांमध्ये स्त्रियांना सुरक्षित गर्भपाताच्या सेवा मोठ्या प्रमाणावर नाकारल्या जात आहेत हा मुद्दा अनेकांकडून वारंवार मांडला जात होता. असे होऊ नये यासाठी विविध पातळ्यांवर काय करता येईल या विषयावर चर्चा करणे हा या चर्चासत्रांमागचा प्रमुख हेतू होता.




**लातूर येथे आयोजित करण्यात आलेल्या चर्चासत्रात मांडणी करत असताना डॉ. गोरख मंद्रूपकर**

**'लिंगनिदानाला विरोध आणि सुरक्षित गर्भपाताच्या सेवांची हमी' या प्रक्रियेसाठी राज्य-सल्लागार समितीची स्थापना:**

स्त्रियांना सुरक्षित आणि कायदेशीर गर्भपाताच्या सेवा नाकारल्या जाऊ नयेत आणि याचबरोबर PCPNDT कायद्याची अंमलबजावणी ही व्यवस्थित केली जावी या मुद्द्याची चर्चा राज्यपातळीवर पोचविण्यासाठी महाराष्ट्रातील महिला आरोग्याच्या मुद्द्यांवर काम करणाऱ्या काही तज्ज्ञांच्या मदतीने राज्य सल्लागार समितीची स्थापना करण्यात आली आहे. या गटाची पहिली बैठक दि. २४ फेब्रुवारी २०१६ ला पुण्यात झाली. या गटाने ठरविल्याप्रमाणे पुढील ३ महिन्यांच्या कालावधीत काही सरकारी अधिकाऱ्यांची भेट, मुंबई येथे पत्रकार परिषदेचे आयोजन असे कृती कार्यक्रम प्रामुख्याने केले जाणार आहेत.

**या प्रकल्पाच्या राज्य सल्लागार समितीचे सदस्य :**
**डॉ. नीलांगी सरदेशपांडे (पुणे),**
**डॉ. शशिकांत अहंकारी (हॅलो मेडिकल फौंडेशन, उस्मानाबाद),**
**डॉ. सीमा किणीकर (निरामय आरोग्यधाम, सोलापूर),**
**डॉ. गोरख मंद्रूपकर (स्त्री-रोग तज्ज्ञ, इस्लामपूर),**
**डॉ. आसाराम खाडे (पुणे),**
**मनीषा तोकले (जागर प्रतिष्ठान, बीड),**
**अरुंधती पाटील (मानवलोक, अंबेजोगाई)**

**लातूर, उस्मानाबाद, सोलापूर आणि नांदेड येथे माध्यमांच्या प्रतिनिधींबरोबर चर्चासत्रांचे आयोजन:**

विविध वर्तमानपत्रे आणि न्यूज चॅनेल्सच्या प्रतिनिधींना सुरक्षित गर्भपात आणि लिंगनिदान या मुद्द्यासंदर्भात माहिती देण्यासाठी या चर्चासत्रांचे आयोजन केले गेले. लातूर, उस्मानाबाद, सोलापूर आणि नांदेड या जिल्ह्यांमधील विविध माध्यमांच्या ७६प्रतिनिधींनी या चर्चासत्रांमध्ये सहभाग घेतला. यामध्ये MTP आणि PCPNDT कायदे, त्यातील फरक याबद्दलची माहिती आणि संवाद माध्यमांचे प्रतिनिधी म्हणून बातमी करत असताना आपली भूमिका काय असावी हे मुद्दे प्रामुख्याने चर्चिले गेले. लिंगनिदानासंदर्भात कोणतीही बातमी करत असताना काय काळजी घ्यायला हवी याबद्दलचे अनेक प्रश्न प्रतिनिधींनी विचारले. महिलांना सुरक्षित आणि कायदेशीर गर्भपाताची गरज असताना त्यांना सेवा नाकारल्या जातात याबद्दलचे अनुभवही अनेकांनी चर्चासत्रांमध्ये मांडले. चर्चासत्रानंतर एकूण १७ वर्तमानपत्रांनी या मुद्द्यांसंदर्भात लिखाण केले.




**सोलापूर येथे संवाद माध्यमांच्या प्रतिनिधींसमोर मांडणी करत असताना डावीकडून बालाजी कांबळे, रेणुका जाधव, प्रीत मंजुषा, डॉ. शशिकांत अहंकारी आणि सतीश राठोड**

**पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा विभागातील गटांमार्फत सुरक्षित गर्भपाताच्या मुद्द्यासंदर्भात विविध कृती कार्यक्रमांचे आयोजन:**

पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाडा या दोनही विभागांमध्ये 'उडान' आणि 'मानिनी' हे दोन गट सुरक्षित गर्भपाताच्या मुद्द्यावर काम करत आहेत. दोनही विभागांमधील विविध संस्था-संघटनांच्या प्रतिनिधींनी एकत्र येऊन तयार केलेले हे गट आहेत. या गटांतील काही सदस्यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमांचा थोडक्यात आढावा पुढीलप्रमाणे:

१. **लिंगनिदानाला विरोध करत असतानाच स्त्रियांना सुरक्षित गर्भपाताच्या सेवा मिळायला हव्यात या संदर्भात ग्रामपंचायतींमध्ये ठराव:**

औरंगाबाद येथे घेण्यात आलेल्या कार्यशाळेमध्ये ठरविल्याप्रमाणे 'मानिनी' या मराठवाड्यातील गटाच्या सदस्यांनी २६ जानेवारीनिमित्त झालेल्या ग्रामसभांमध्ये १०६ गावांमध्ये'आम्ही आमच्या गावातील सर्व ग्रामस्थ लिंगनिदानाला विरोध करतो. सोबतच महिलांना शासकीय आरोग्य सेवांनी सुरक्षित गर्भपाताच्या सेवा नाकारू नयेत असा ठराव आम्ही घेत आहोत' हा ठराव केला. यानिमित्ताने त्यांनी ग्रामपंचायतीशी संबंधित असणाऱ्या अनेक स्त्री-पुरुष कार्यकर्त्यांबरोबर पूर्वतयारीच्या बैठकाही घेतल्या. आत्तापर्यंत ८५ ठरावांच्या प्रती ग्रामसेवकांकडून घेण्यात आल्या आहेत. हे सर्व ठराव एकत्रित केल्यानंतर संबंधित तालुका आरोग्य अधिकारी आणि जिल्हा शल्य- चिकित्सक यांच्याकडे देण्यात येणार आहेत.

२. **'मर्जी' हॉटलाईनचा विविध ठिकाणी प्रसार आणि प्रचार:**

पश्चिम महाराष्ट्रातील गटाचे सदस्य सतीश राठोड (निरामय आरोग्यधाम सोलापूर) यांनी अक्कलकोट तालुका आणि सोलापूर शहरामध्ये 'मर्जी' हॉटलाईन संदर्भात माहिती सांगण्यासाठी कार्यक्रमांचे आयोजन केले. अक्कलकोट येथे डॉ. मोरे (माजी सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी, सोलापूर) आणि श्री. बालाजी कांबळे (समन्वय अधिकारी, सीफार, सोलापूर) यांनी मर्जी हॉटलाईनच्या पोस्टरचे उद्घाटन केले तर सोलापूर शहरात श्री. भगवान भुसारी (जिल्हा कार्यक्रम अधिकारी, IDS नियंत्रण केंद्र, Civil Surgeon कार्यालय), श्री. बगाडे (अन्नधान्य वितरण अधिकारी), डॉ. बालाजी किणीकर (अध्यक्ष, निरामय आरोग्यधाम), डॉ. सीमा किणीकर (प्रकल्प संचालिका, निरामय आरोग्यधाम) यांच्या हस्ते मर्जी हॉटलाईनचे उद्घाटन केले गेले. दोन्ही कार्यक्रमांमध्ये एकूण १६५ महिलांनी सहभाग घेतला.

मराठवाड्यातील गटाच्या सदस्य कुशावर्ता बेळे यांनी ८ मार्च निमित्त आयोजित करण्यात आलेल्या महिला मेळाव्यात 'मर्जी' हॉटलाईनबद्दल माहिती दिली. या कार्यक्रमात साधारणपणे २५० महिला सहभागी झाल्या होत्या. याचबरोबर पोलीस दक्षता समितीच्या सदस्यांबरोबरही एका चर्चासत्राचे आयोजन त्यांनी केले. या कार्यक्रमात महिलांना सुरक्षित गर्भपाताची असणारी गरज आणि मर्जी हॉटलाईनबद्दल माहिती दिली गेली.



**महिला दक्षता समितीच्या सदस्यांबरोबर संवाद साधताना कुशावर्ता बेळे**

■■■





## गर्भपातासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाचा महत्त्वाचा निर्णय : जुलै २८, २०१५

ही गुजरातमधील घटना आहे.... १४ वर्षांच्या एका मुलीवर डॉ. जतीनभाई मेहताने उपचारांदरम्यान बलात्कार केला आणि तिने ही गोष्ट कोणाला सांगू नये म्हणून धमकी दिली. या बलात्कारामुळे ती मुलगी गरोदर राहिली आणि ही बातमी तिच्या घरच्यांना समजली. तिचा गर्भपात करण्यासाठी घरच्यांनी प्रयत्नही केले परंतु तोवर २० आठवडे उलटून गेले होते.

यानंतर मुलीच्या कुटुंबाने गुजरात उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आणि गर्भपातासाठी परवानगी मागितली. पण उच्च न्यायालयाने गर्भपातासाठी परवानगी नाकारली कारण वैद्यकीय गर्भपाताच्या कायद्याप्रमाणे २० आठवड्यांपर्यंतच गर्भपात कायदेशीर मनाला जातो. उच्च न्यायालयाने नाही म्हणाल्यानंतर मुलीच्या कुटुंबियांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली.

सगळी परिस्थिती समजल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने ५ डॉक्टरांच्या एका गटाची नेमणूक केली आणि आदेश दिला की, मुलीच्या तपासणीनंतर जर अनुभवी डॉक्टरांनी सांगितले की तिचा गर्भपात करता येईल तर मुलीच्या व तिच्या पालकांच्या परवानगीने तिचा गर्भपात केला जावा. या गरोदरपणामुळे जर मुलीच्या जीवाला गंभीर धोका होणार असेल तर तिचा गर्भपात करण्याचा निर्णय डॉक्टरांचा गट घेऊ शकतो. असा निर्णय न्यायालयाने दिला. याचबरोबर डॉ. जतीनभाई मेहता यांच्याविरुद्ध बलात्काराचा खटला चालविण्याचा आदेश न्यायालयाने दिला.

सर्वोच्च न्यायालयाने अल्पवयीन मुलीच्या गर्भपातासंदर्भात दिलेला हा ऐतिहासिक निर्णय आहे असे म्हणायला हरकत नाही. या निर्णयामुळे आपल्यावर झालेल्या अन्यायाविरुद्ध लढण्यासाठी अनेक मुलींना उमेद तर मिळेलच पण इथून पुढेही एखाद्या २० आठवडे पूर्ण झालेल्या गर्भपाताच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाचा हा निर्णय केस-लॉ म्हणूनही वापरता येवू शकतो.

■■■

### पुढील अंकाचा विषय : लिंगनिदान

खाजगी वितरणासाठी

बुक-पोस्ट

मर्जी
माझ्या शरीरावर माझा हक्क
जानेवारी - मार्च, २०१६
अंक तिसरा

**कार्यकारी संपादक**
आनंद पवार

**संपादक मंडळ**
मिलिंद चव्हाण, डॉ. गोरख मंद्रुपकर
मनीषा तोकले, ज्योती भालकर,
प्रितम पोतदार

**मांडणी व छपाई**
संस्कृती डिझायनर्स, पुणे

सम्यक
संवाद व संसाधन केंद्र, पुणे

**प्रकाशक:**
**सम्यक - संवाद आणि संसाधन केंद्र**
बी३/१४, दामोदर नगर, हिंगणे खुर्द, सिंहगड रोड, पुणे ४११०५१
**फोन :** +९१ ९४०३५१६२३७ **ईमेल :** samyak.pune@gmail.com